**MHRG190008612023**

:: <u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक १/२०२१ मधील निशाणी क्र.२६ वरील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाला क्र.३ यांनी त्यांचेविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व अर्जदाराने दिलेले म्हणणे वाचले. सामनेवाला व अर्जदार यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. सामनेवाला क्र.३ चे कथन की, नेमलेल्या तारखेस अर्जदार यांचे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास घेण्याचे राहिलेले आहे. आज रोजी सामनेवालातर्फे वकील उलटतपास घेण्यास तयार आहेत. तरी उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

०४. अर्जदाराने सामनेवाला क्र.३ च्या प्रस्तुतच्या अर्जास सक्त हरकत नोंदविली आहे.

०५. अर्ज, अर्जाला दिलेले म्हणणे व परस्पर विरोधी युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचे मुळ अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.३ तसेच अर्जदार यांचे प्रस्तुत वादामध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला क्र.३ यांनी आज रोजी

उलटतपास घेण्यास तयार असल्याबाबत कथन केले आहे. मुळ अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.३ यांना उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सामनेवाला क्र.३ विरुध्द 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द करुन उलटतपास घेण्यास परवानगी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जाचा निकाल गुणानुगुणांवर चालुन उभय पक्षातील वादाला पुर्णविराम मिळेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.३ विरुध्द दिनांक ०८.०१.२०२६ रोजी पारित झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द करण्यात येतो व सामनेवाला क्र.३ यांना उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.02.05 15:19:10 +0530

महाड,
दिनांकः०५.०२.२०२६

(**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड